divyamarathi.com

# एमआयटीत आरोग्य तपासणी शिबिर

**प्रतिनिधी** | औरंगाबाद

वैजापूर तालुक्यातील एम.आय.टी. रोटेगाव येथे विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरासाठी संस्थेतील सिव्हिल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रित करण्यात आले होते. एकूण २७९ पालक आणि विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. औरंगाबाद येथील एम.आय.टी. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे कार्यरत निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.अंकित जैन, डॉ.विक्रम भोकरे, डॉ.योगेश पांडे, डॉ. मयुरी शिंदे यांनी सर्व उपस्थित पालक व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. आवश्यकतेनुसार काहींना पुढील तपासणीसाठी औरंगाबाद येथील हॉस्पिटलला भेट देण्याच्या सूचना केल्या. संस्थेचे प्राचार्य प्रा.एम.आर. वैद्य यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मुलांच्या प्रगतीबरोबरच पालकांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी पालकांनीही नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी. ग्रामीण भागातील रुग्णालयांत अजूनही मूलभूत सुविधा पुरवल्या जात नसल्याने चांगल्या आरोग्यासाठी जनजागृती करणे गरजेचे असून यासाठी विद्यार्थ्यांनी




पुढाकार घेण्याचे डॉ.अंकित जैन यांनी आवाहन केले. या वेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.व्ही.जी.तळेकर, सर्व विभाग प्रमुख प्रा.ए.एस. नागरिक, प्रा.एस.एन. पाठक, प्रा.व्ही.एम.जाधव, प्रा.जी.ए.भिसे व प्रा.वाय. के.धोत्रे उपस्थित होते. यशस्वितेसाठी इलेक्ट्रॉनिक्स विभागातील प्रा.वैशाली जोशी, प्रा.विजया धोपटे, प्रा. साईनाथ गायके, प्रा.अमोल देवडे, प्रा.गणेश पुरी व प्रा. विवेक जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.वाय. ए.कवडे, महासंचालक प्रा.मुनीष शर्मा, संचालक प्रा.डॉ.शकुंतला लोमटे, संचालक प्रा.बिजली देशमुख यांनी उपस्थित सर्व पालक, विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना चांगल्या आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.

<< Previous Headlines Next Headlines >>